अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

MO.9860898564

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -७४ | रविवार दि.०३ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -74 | SUNDAY DT.03 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## महाराष्ट्र राज्य फॉरेस्ट रेंजर्स असोसिएशनच्या मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्ष पदी काकडे यांची निवड

बीड ।प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य फॉरेस्ट रेंजर्स असोसिएशन च्या मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्ष पदी वन परीक्षेत्र अधिकारी काकडे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड मराठवाडा अध्यक्ष राहुल सपकाळ, यांच्या अध्यक्षतेखाली, सर्वानुमते करण्यात आली आहे. वन विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी प्रबळ व स्वच्छ प्रतिमा असलेले बीड विभागाचे चे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री काकडे यांची आली. काकडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र फॉरेस्ट रेंजर्स या असोसिएशनला त्यांच्या स्वाच भुमीका असलेला नंवा चेहरा मिळवला आहे. या असोसिएशन मार्फत वन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या निवड करण्यात अडी-अडचणी सोडवणे, त्यांच्या न्याय हक्कासाठी वेळोवेळी पाठपुरावा करणे, वन विभागाची प्रतिमा उंचावणे, शासनाने ठरवुन दिलेले ध्येय व उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी प्रयात्र करणे. हे या असोसिएशन चे मुख्य उद्दीष्ट आहे. काकडे यांची महाराष्ट्र राज्य फॉरेस्ट रेंजरस असोसिएशन महाराष्ट्र राज्यच्या मराठवाडा विभागाच्या उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे महाराष्ट्र भरातुन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षा होत आहे.

# मध्य प्रदेशातील विजयावर पंकजा मुंडे यांच्या तीव्र भावना



## म्हणाल्या, ओबीसी आरक्षण वाचवल्यामुळे मध्य प्रदेशात भाजप सरकार

मुंबई /प्रतिनिधी

मध्य प्रदेश, राजस्थानसह छत्तीगडमध्ये भारतीय जनता पक्षाने पूर्ण बहुमत मिळवले आहे. भाजपच्या या विजयाचे श्रेय भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिले आहे. पंकजा मुंडे यांनी मध्य प्रदेशमधील विजयाला तेथील मुख्यमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांच्या दोन निर्णयाचा परिणाम असल्याचे म्हटले आहे. ओबीसी आरक्षण वाचवल्यामुळे आणि लाडली बहन योजनेमुळे लोखो महिलांनी भाजप सरकारला आशीर्वाद दिला असल्याचे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. मध्य प्रदेशमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा देखील महत्त्वाचा मानला जात होता. तसेच महाराष्ट्रातही सध्या आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा बनला आहे. मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमिवर ओबीसी समाजाला नाराज न करण्याचा भाजपचा प्रयत्न दिसून येत आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांनी व्यक्त केलेल्या या मताला महत्त्व प्राप्त झाले आहे.राज्यात सध्या मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरु आहे. राज्यभरात मनोज जरांगे पाटील हे आरक्षणासाठी सभा घेत आहेत. तर दुसरीकडे ओबीसी आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण न देण्याची मागणी ओबीसी समाजाने केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीमधील ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे ओबीसी समाजाला नाराज न करता भाजपला मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर पंकजा मुंडे यांनीही ही सूचक पोस्ट केली आहे.

ही माझी तीव्र भावना आहे. मध्य प्रदेशातील अनेक प्रगतीशील योजनांपैकी पृथ्वीराज चव्हाण यांचे दोन निर्णय १. `लल चे आरक्षणात अडथळा न येऊ देता वाचवणे २. महिलांना सक्षम करण्यासाठी लाडली बहन, यामुळे लाखो महिलांनी आम्हांला खऱ्या अर्थाने पक्ष म्हणून आशीर्वाद दिला. मध्य प्रदेशचे भाजप प्रदेशाध्यक्ष विष्णुदत्त शर्मा आणि संपूर्ण टीम ज्यांनी कठोर परिश्रम घेतले. माझ्याकडून त्यांचे मनापासून अभिनंदन. महिला मतदारांनी लक्षि ला पसंती दिली आहे. नरेंद्र मोदी यांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी दिलेल्या आदेशावर अथकपणे काम करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन.

देशात चार राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राचे चेहरे चांगलेच झळकले आहेत. या राज्यांची जबाबदारी वेगवेगळ्या पक्षाने महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांवर सोपवली होती. यात सर्वात महत्त्वाचा असलेल्या मध्य प्रदेशची जबाबदारी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर होती. गोवा राज्यात लागलेल्या निकालाप्रमाणे मध्य प्रदेश मधील निकालाने देखील देवेंद्र फडणवीस यांच्या मेहनतीला फळ दिले आहे. त्यानंतर राजस्थानची जबाबदारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने भाजप महिला मोर्चाच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा विजया रहाटकर या मराठमोळ्या चेहऱ्याकडे दिलेली होती. विजार रहाटकर यांची कामगिरी देखील आता सर्वांसमोर आहे. राजस्थानमध्ये भारतीय जनता पक्षाने पूर्ण बहुमत मिळवले आहे.

## पिंपळनेर सर्कलचा ढाण्या वाघ शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर (सर) सातपुते



पिंपळनेर ।प्रतिनिधी

बीड: गेल्या आनेक वर्षांपासून शिवसेनेच्या लहान मोठ्या पदावर काम करताना परमेश्वर सातपुते सर यांनी शिवसैनिक म्हणून काम केले. शिवसेनेत उभी फुट पडल्यानंतर त्यांना आमिशे दाखवण्यात आली.परंतु त्यांनी ठाकरे कुटुंब आणि खऱ्या शिवसेनेवरची निष्टा ढळु दिली नाही. यांचे फळ त्यांना मिळाले आसुन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे व वरिष्ठ नेत्यांनी परमेश्वर सातपुते सर यांची शिवसेना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. परमेश्वर सातपुते सर हे छोट्या गावातुन व आणि चळवळीतुन पुढे आलेला कार्यकर्ता आहे.त्यांनी कायम प्रस्थापितांशी संघर्ष केला आहे.सामान्य कुटुंबातुन पुढे येत सरपंच बनलेला परमेश्वर सातपुते सर शिवसैनिक म्हणून शिवसेनेत दाखल झाले.त्याचे काम पाहुन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे,युवासेनाप्रमुख

आदित्या ठाकरे व वरिष्ठ नेत्यांनी किसान सभेच्य जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपवली.किसान सभेच्या माध्यमातून अनेक शेतकर्यांना शिवसेनेशी जोडले.दरम्यान त्यानी शिवसेना जिल्हाप्रमुख पद मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. ते मिळाले नाही.म्हणून नाराज न होता परमेश्वर सातपुते सर यांनी निष्टा जपली.युवापत्रकार समद शेख ताडसोन्ना

## भंगार दुकानावर कागदपत्रे नसलेल्या पाच दुचाकी दुकान मालकावर गुन्हा

गेवराई ।प्रतिनिधी

स्क्रैप सेंटरवर कागदपत्रे व मालकी हक्क नसलेल्या मोटारसायकल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी कारवाई करत १९ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल केला आहे , जातेगाव रोडवरील मंजिल स्क्रैप सेंटर कोणत्याही कागदपत्रे मालकी हक्क नसल्याचे पाच मोटरसायकलवर गेअर बॉक्स




ठेवल्याची माहिती पोलीस निरीक्षक मराठी यांना मिळाली होती त्यांनी मंगळवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास स्क्रॅप सेंटरची पाहणी केली असता पाच मोटरसायकल व गिअर बॉक्स आढळून आले, स्क्रैप सेंटरचे मालक नय्युम ईस्माईल सय्यद यांच्याकडे विचारणा केली असता, कोणते ही कागद पत्रे आढळून आले नाही. या मोटार सायकल व गिअस बॉक्स चोरीची असल्याच्या संशयावरून१९ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोटार सायकल पोलिस ठाण्यात लावल्या आहेत. अशोक हबर्डे यांच्या तक्रारीवरून स्क्रैप सेंटर मालक नय्युम ईस्माईल सय्यद याच्या विरोधात गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष जंजाळ, पोलिस उपनिरीक्षक डॉ. शिवाजीभुतेकर, सुरेश पारधी, संजय सोनवणे, अशोक हबर्डे, बागवान यांनी केली. गेवराई तालुक्या मध्ये मोटर चोर सौर पंप चोर यांचे प्रमाण वाढले आहे, अनेक दिवसा पासून अनेक टोळया ह्या रात्री विहीर मधुन मोटर चोरी करून त्या मधील तांब्याची तार, वायर मधील ताब्याची तार विक्री करत आहेत, शेतकरी वर्ग या मोटार चोरा मुळे वैतागला आहे , शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे की गेवराई तालुक्यातील अनेक स्क्रब सेंटर आहेत त्यावर पोलिसांनी छापे टाकून त्याची तपासणी करावी , व खात्री करावी की हे चोरीचा मोटार व ताब्याची तार घेत नाहीत ना ? गेवराई मधील मोटर चोरीचा माल जातो कुठे, तपास लावणे पोलीस समोर एक आव्हानच आहे.

## सर्वांना सोबत घेऊन पक्ष वाढी चे काम करणार-जिल्हा प्रमुख गणेश वरेकर



आज सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयांत बीड तालुका पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकी प्रसंगी बोलताना जिल्हा प्रमुख गणेश वरेकर म्हणाले की शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धव ठाकरे साहेब यांनी माझ्यावर बीड आणि माजलगाव विधानसभा मतदार संघाची जिल्हा प्रमुख म्हणून निवड केली आहे त्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे तो मी सार्थ ठरवणार आहे मी जिल्ह्यातील सर्व अजी माजी पदाधिकारी लोप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊन पक्ष वाढी चे काम करणार व येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला विजयी करण्यासाठी जीवाचे रान करणार या बैठकीत सर्वानुमते पक्ष वाढी चे नियोजन करण्यात आले या बैठकी साठी खालील पदाधिकारी उपस्थित होते शिवसेना जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, उपजिल्हा प्रमुख हनुमंत जगताप, बंडू भाऊ पिंगळे, जिल्हा संघटक नितीन धांडे, सहसंघतक रतन गुजर शहर प्रमुख शेख निजाम, तालुका प्रमुख गोरख शिंघन, सुशील पिंगळे, गोरक्षनाथ कदम, संदीपान कदम, रामनारायण जाधव, लक्ष्मण शिंदे, संतोष वरेकर, संतोष हिंगणे, सुधीर काकडे, समाधान हींगणे माचिंद्रा कुटेहे उपस्थित होते






## महाविजय २०२४ जल्लोषात स्वागत ...!

### मध्यप्रदेश- राजस्थान छत्तीसगड- विधानसभा निवडणूक यशाचा बीड भाजपातर्फे आनंदोत्सव

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड विधानसभा निवडणुकीत भरघोस विजयाची मुसंडी मारून यशाची परंपरा कायम राखली. देशभरात विजयाचा आनंद साजरा केला जातो आहे. भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष मा. राजेंद्र मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालयासमोर भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष ढोलताशांचा गजरात फटाक्यांची आतिषबाजी करून विजयोत्सव साजरा केला.

यावेळी प्रा. देविदास नागरगोजे, चंद्रकांत फड, सलीम जहांगीर, डॉ.लक्ष्मण जाधव,अजय सवाई, शांतिनाथ डोरले, बालाजी पवार, मुसा खान, डॉ.अभय वनवे, शरद नवले, किरण बांगर, अनिल चांदणे, लताताई मस्के, डॉ. जयश्रीताई मुंडे, शरद बडगे, शरद घोलप, आप्पासाहेब झोडगे, बद्रीनाथ जटाळ, सोमनाथराव माने, अमोल वडतिले, शफिक पेंटर, सचिन आगाम, कल्याणराव पवार, सुरेश माने, चव्हाण टेलर, बंडू वाजे, राकेश बिराजदार, महेश सावंत, केशव बडे, अभय चव्हाण, रसाळ सर, लक्ष्मण भिंगले, डोईफोडे गणेश, संध्याताई राजपूत, अनिताताई जाधव, लताताई राऊत, दुष्यंत डोंगरे, नितीन आमटे, अश्विन शेळके, अजय ढाकणे, चंदकांत फड, लालासाहेब पन्हाळे आदीसह कार्यकर्ते बहुसंखेने उपस्थित होते.

# चौसाळा शहरात दिवसा ढवळ्या चोरी

# चौसाळा शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले

## चारच कर्मचारयावरती चौसाळा पोलीस चौकीचा कारभार

चौसाळा ।विवेक कुचेकर

बीड तालुक्यातील चौसाळा शहरातील सतिष सर्जेराव माने हे येथील गायत्री नगर भागात राहतात त्यांची पत्नी ही माहेरी गेलेली व सतिष माने हे त्यांना सकाळी आणण्यासाठी गेले असल्याचा फायदा घेऊन दिवसा ढवळ्या घरातील सहा तोळे सोने,रोख रक्कम ८० हजार व सि सि टिव्हीचा डिव्हिआर चोरट्यांनी पळवला असल्यामुळे चौसाळा शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे या घटनेमुळे नेकनुर पोलीसा समोर मोठे आव्हानच उभे राहीले आहे याबाबत अधीक माहीती अशी की,

चौसाळा येथील रहिवासी सतिष सर्जेराव माने यांच्या गायत्री नगर येथील घरी शनिवार दिनांक २ डिसेंबर रोजी आदांजे दुपारी २ वाजेच्या सुमारा आधी चोरी झाली.सतिश माने यांची पत्नी माहेरी गेल्या होत्या आणि सतिष माने हे घरच्यांना सकाळी माहेरवुन आनायला गेले होते.सतिष माने हे त्यांच्या घरच्यांना घेऊन आले तेव्हा गेटवर गाडि लावताच त्यांच्या पत्नीला एक खिडकी उघडी दिसली.त्यांनी सतिष माने यांना ति खिडकी उघडी कशी? असा सवाल केला त्यावर माने यांनी त्यांच्या बोलण्याला शिरियस न घेता सतिष माने म्हणाले तुझ्याकडुन उघडी राहिली असेल परंतु त्यांच्या पत्नी म्हणाल्या मि खिडक्या सर्व बंद करून गेलते. सतीष माने यांनी गेटचा टाळा उघडला आणि दरवाज्याचा हि टाळा उघडला असता दरवाजा आतुंन लावलेला त्यांना जानवला मंग त्यांनी दुसरा पाठिमाघिल दरवाजा पाहिला असता तो उघडा दिसला त्यानंतर त्यांनी धावत घरात जाऊन पाहिलं असता घरातील सामान



अस्ताव्यस्त पडलेले त्यांना आढळून आले.त्याच्या लक्षात आलं कि आपल्या घरात कोणीतरी घुसलं होतं. त्यांनी लागलीच इकडे तिकडे पाहिलं असता कपाट व कपाटातील सामान त्यांना अस्ताव्यस्त पडलेले दिसलेले त्यानंतर त्यांनी सीसीटिव्ही चेक करायला लागले तर ते चालु दिसेना मंग ते डिव्हिआर पाहायला गेले असता तो पण गायब झालेला दिसला सतिष माने व त्यांच्या पत्नी घाबरून गेले कारण त्यांची अयुष्यभराची पय पय करून जोडलेली कमाई एका क्षणात नाहीशी झाली होती.त्यानंतर सतिष माने यांनी पत्नीला धिर देत लागलीच ,पोह खटाने यांना फोन केला व पो ,हे, खटाने यांनी नेकनुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पान पाटील साहेब यांना सर्व माहिती कळवली,पान पाटील साहेब यांनी पोलीस निरीक्षक विलास हजारे यांना माहिती दिली व पुढील तपास सुरू करण्यात आला लागलीच तपास करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक पान पाटील,पो.हे.खटाने,पो हे.मुरूमकर, पो,ना, पुंडे , यांनी व

बीडचे फिंगरप्रिंट एक्स्पर्ट व स्वान पथक व कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपासाला गती दिली असली तरी दिवसा ढवळ्या झालेल्या या चोरीमुळे चौसाळा शहरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. चौसाळा व परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन चौसाळा पोलीस चोकीला चारच कर्मचारयावरती पंसवीस गावचा भार असल्यामुळे याठिकाणी पोलीस कर्मचारी वाढवण्याची मागणी जोर धरत आहे



मोमीन पुरा बायपास या ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते ,या ठिकाणी मोठा दुर्गंध पसरला होता लोकांच्या आरोग्यावर यामुळे परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती ,ही गंभीर समस्या लक्षात घेता या ठिकाणी स्वच्छता करणे गरजेचे होते यामुळेच आज या ठिकाणी स्वच्छता करून घेत असताना खादिम ए मिल्लत वाजेद जावेद कुरेशी

# लिंबागणेश ग्रामपंचायतने अंगणवाडी साठी बसवलेले फिल्टर फक्त देखाव्यासाठी का ?

पाणी फिल्टर धुळखात..

लिंबागणेश ।हरिओम क्षीरसागर

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश गाव गावची लोकसंख्या जवळपास ३००० ते ४००० च्या आसपास आहे. ग्रामपंचायत ला १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून अंगणवाडी साठी पाणी फिल्टर बसवण्यात आले. त्यासाठी आलेला एकुण खर्च पाणी फिल्टर साठी ७९९५० हजार रू तर पाण्याची टाक्या बसवण्यासाठी ३५००० हजार रुपये एवढा खर्च केला असुन. पाणी फिल्टर बसवून तीन महिने झाले तरी अजुन ते चालु सुद्धा केले नाहीं. किंवा ते चालु आहे का हे देखील तपासले नाही.




आणि ते फिल्टर तीन महिन्यापासून धुळखात पडून आहे. लिंबागणेश गावात एकुण तीन अंगणवाड्या असुन एकाही अंगणवाडीत लाईट नाही मात्र लाईट फिटिंग सर्वत्र केलेली आहे. आणि अंगणवाडी बसवलेल्या टाक्यात तर काही ठिकाणी पाणी सोडण्यासाठी त्यास पाईप देखील काढलेला नाही अंगणवाडी सेविकांना देखील प्रश्न पडलेला आहे की त्या टाकीत पाणी कसे सोडावे ? तसेच अंगणवाडी सेविका लहान मुलांना फिल्टर बसवून देखील त्यांना बोअरवेल चे पाणी पिण्यासाठी वापरत आहेत. मग फिल्टर अंगणवाडी साठी फक्त खर्च दाखवण्यासाठी उचलला आहे का .

# तलवाडा मतिमंद महाविद्यालय जागतिक अपंग दिन साजरा

# दिव्यांग बांधवांचा सन्मान व्हावा -पोलीस निरीक्षक वाघमोडे

सुमेध करडे ।तलवाडा

गेवराई तालुक्यातील अंतरवाडी रोड तलवाडा मतिमंद विद्यालय या प्रमुख पाहुण्याच्या उपस्थितीत जागतिक अपंग दिन साजरी करण्यात आला आहे तसेच अडवोकेट सुरेश हत्ती यांच्या वाढदिवसानिमित्त दहा वर्षापासून शाळेतील विद्यार्थ्या सोबत अपंग दिन साजरी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी करण्यात आला आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील अपंग मतिमंद विद्यालय या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्ष राष्ट्रीय अपंग दिन साजरी करण्यात आला आहे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे उपस्थित होते यावेळी बोलताना ते म्हणाले की, अपंग दिन हा १९९२ च्या ३ डिसेंबर पासून जागतिक दिव्यांग




दिन साजरा करण्यात येतो जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्तींबाबत सर्वसामान्य जनतेत (समाजामध्ये) जनजागृती निर्माण व्हावी, दिव्यांग बांधवांचा सन्मान व्हावा, त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन करण्यासाठी समाजामध्ये जनजागृती व्हावी. या उद्देशाने दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. तसेच समाजातील प्रत्येक घटकांनी दिव्यांगांच्या प्रति, सहानुभूती न दाखवता त्यांना संधी देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने दिव्यांग व्यक्तींच्या समस्या समजावून घेता याव्यात याबाबत समाजात जनजागृती व्हावी, दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेऊन, त्यांच्या उध्दारासाठी मदत मिळावी. या उद्देशाने साजरा करण्यात यावा तसेच तलवाडा गावचे माजी जिल्हा परिषद सदस्य एडवोकेट सुरेश हात्ते म्हणाले की मी गेल्या दहा वर्षांपासून माझा वाढदिवस हा अपंग मतिमंद विद्यार्थ्यासोबत साजरी करत असून यापुढेही साजरी करणार आहे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद करत असलेल्या कार्याबद्दल शुभेच्छा दिल्या पत्रकार सुमेध करडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून शाळेतील सर्व स्टॉफ ला करत असलेल्या कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले आहे यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हत्ते, माजी पंचायत समिती सदस्य खलील भाई, शेख पत्रकार सुमेध करडे, कावळे टेलर,शाळेचे मुख्याध्यापक खोडके. सर सर्व शिक्षक वृद्ध विद्यार्थी आदी उपस्थित होते

## निष्ठावंत मानिक वाघमारे....

केरळ व बिहार राज्याचे माजी राज्यपाल,महामहीम दिवंगत माननीय दादासाहेब रा.सु.गवई साहेब यांच्या नातवाच्या विवाहप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश मा भूषणजी गवई साहेब रिपाई चे राष्ट्रीय नेते मा.राजेंद्रजी गवई साहेब यांची भेट झाली तो क्षण...यावेळी त्यांच्या कमलकृष्ण या निवासस्थानी आईसाहेब मा.कमालताई गवई यांच्या हस्ते सन्मानित केले.

# एकताचे आदर्श शिक्षक, पत्रकारिता, सामाजिक कार्यकर्ता, ग्रंथालय कार्यकर्ता, जीवनगौरव पुरस्कार जाहीर

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

वेदनेला फुंकर माणुसकीची हे ब्रीदवाक्य घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेमार्फत येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी गोमळवाडा ता.शिरुर कासार जि.बीड येथे ६ वे एकता मराठी साहित्य संमेलन संपन्न होत असून या कार्यक्रमानिमित्त राज्यस्तरीय एकता आदर्श शिक्षक पुरस्कार, म.शेख चाँद शेख लाल (पोलीस) राज्यस्तरीय एकता आदर्श पत्रकारिता पुरस्कार, स्व.डॉ.भगवानराव चेमटे राज्यस्तरीय एकता आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, कै.पांडुरंग खेडकर (सर) एकता आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार आणि एकता जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती फाउंडेशन च्या सल्लागार ड.भाग्यश्री ढाकणे आणि उपाध्यक्ष प्राचार्य माही शेख यांनी दिली.

एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांच्या अध्यक्षतेखाली आणि ६ व्या एकता मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.भास्कर बडे व स्वागताध्यक्ष अजिनाथ गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत एकता कोअर कमिटीची बैठक नुकतीच संपन्न झाली यावेळी सचिव पत्रकार गोकुळ पवार यांनी एकता आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी के.प्रा.शा.वहाली ता.पाटोदा जि.बीड येथील उपक्रमशील शिक्षिका तथा कवयित्री नजमा शेख यांचे नाव सुचवले. तद्नंतर म.शेख चाँद शेख लाल (पोलीस)





राज्यस्तरीय एकता आदर्श पत्रकारिता पुरस्कारासाठी संस्थापक सदस्य लखुळ मुळे यांनी दै.लोकप्रश्न चे संपादक दिलीप खिस्ती यांचे नाव कमिटीसमोर मांडले. स्व.डॉ.भगवानराव चेमटे राज्यस्तरीय एकता आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कारासाठी आपला परिवार वृध्दाश्रम, कळसंबर च्या संस्थापिक मनिषा पवार यांच्या नावाची शिफारस फाउंडेशन चे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर यांनी केली. कै.पांडुरंग खेडकर (सर) उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कारासाठी फाउंडेशन चे संस्थापक सदस्य नितीन कैतके यांनी प्रभाकर सानप यांच्या नावाची सुचना उपस्थितांना केली तर स्व.प्रा.हरी नरके यांना एकता जीवन गौरव पुरस्कार मरणोत्तर प्रदान करावा असा प्रस्ताव स्वागताध्यक्ष अजिनाथ गवळी यांनी बैठकीत मांडला.वरील सर्व प्रस्ताव चर्चेअंती एकमताने मंजूर करण्यात आल्याचे फाउंडेशन चे संस्थापक सदस्य व्यंगचित्रकार दिपक महाले व राजेश बीडकर यांनी जाहीर केले. या बैठकीसाठी एकताचे सदस्य शिवचरित्रकार कैलास तुपे, महिला आघाडीच्या रंजना फुंदे, मिरा दगडखैर, डॉ.शोभा सानप, शोभा राजळे, रंजना डोळे, लता बडे, सामाजिक कार्यकर्ते समीर पठाण, से.नि.कें.प्र.जालिंदर तावरे, से.नि.पो.उप नि.तुकाराम डमाळे, इंजि.संदीप ढाकणे, फौजी कैलास खेडकर, प्रा.महेश नागरे, महादेव कातखडे, अभिमन्यू कातखडे, महादेव राऊत, पो.कॉ.ज्ञानेश्वर पोकळे, देवीदास शिंदे, इम्रान शेख यांची उपस्थिती होती.

# उमापुर मधील संतपोल बिलीवर्स चर्चच्या माध्यमातुन आदर्श पाच पुरस्कार जाहिर

## ऐ पी आय नारायण ऐकशिगें पत्रकार शेख आमीन तुकाराम धस व समाजसेवक धर्मराज करपे ' सुनिल भोपळे यांचा समावेश











उमापूर (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील उमापुर येथील बिलीवर्स चर्च येथे दरवर्षा प्रमाणे चर्चाच्या माध्यमातुन सामजिक समाज सेवक पत्रकार उत्कृष्ठ कामगिरी बजावनारे शासकीय कर्मचारी यांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन केरळ राज्याच्या महत्वाच्या संबोधित असलेल्या सर्वात मोठे चर्च याच्या वतीने हा पुरस्कार विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दि २५ डिंसेबर रोजी उमापुर येथील चर्च मध्ये ख्रिसमस नातळ या सणाच्या दिवशी प्रदाण करण्यात येणार आहे अशि माहिती उमा पुर बिलीवर चर्चचे . विनोद कापसे फादर यांनी जाहिर केले आहे

चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी एपी आय नारायण एकशिगें हे गेल्या काही महिन्या पासुन रुजु झाल्या पासुन सर्वच अवैध रित्या चालनार्य धंध्यावर धडक कारवाई करण्याचे काम त्यांनी करत आहेत त्यामुळे या भागात अवैध धंद्या वाल्याची झोप उडाली आहे तसेच चकलांबा पोलीस हद्दीत आठरा ते बावीस खेडे गावे आहेत व तेथील वातावरण शांततेत पार पाडले आहे

पत्रकार तुकाराम धस पत्रकार शेख अमिन हे चुकीचे काम करत नसल्याने परीणामाची चिंता करत नाही ठाम विचार असलेल्या प्रत्येक क्षेत्रात प्रमाणिक पणे असल्याने कशाचीही भिती व पर्वा न बाळगनारे आहेत त्यांनी ध्येय पत्रकारित्याच्या माध्यमातुन बाजु मांडण्याचे धाडस करत असतांना कोणालही न घाबरता कोणाच्या दबावाखाली न पडता कुठलाहि होणार्या परिनामाला समोर जाण्याची ताकत ठेवतात त्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध पत्रकारिताच्या माध्यमातुन अवाज उठवून चागल्या चांगल्याना धडा शिकवला आहे सर्व राजकीय पक्षाचे नेते पदाधिकारी यांच्याशी संपर्क आहे तुकाराम धस शेख अमिन डेरिगबाज पत्रकार आसुन जिथे अन्याय अत्याचार भ्रष्टचार होतो या विरुद्ध अवाज उठवत ठाम पणे लढा देत न्याय देण्यासाठी कुठेही कमी पडत नाहीत

समाज सेवक व शिक्षक धर्मराज करपे व सुनिल भोपळे यानी होतकरू गोर गरिबांना अध अपगना जिवन जगताना येणार्या अडचणी वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांच्या गरजा भागविण्याचे काम त्यांनी केले तसेच उमापुर बिलिवर चर्चचेच्या माध्यमातुन गेल्या अनेक वर्षा पासुन सामजिक उपक्रम राबवून गोर गरिबांच्या अडचणी दुर केल्याने फादर कापसे हे तेथील देवदुत म्हणुन ओळखत आहेत.

# बीड शहरातील सिग्नल त्वरित सुरू करा

## सामाजिक कार्यकर्ते- गौतम ओव्हाळ यांचा आंदोलनाचा इशारा

बीड (प्रतिनिधी :) बीड शहरात गत अनेक दिवसापासून सिग्नल बंद अवस्थेत पडलेले आहेत. यामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून हे सिग्नल त्वरित सुरू करण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते गौतम ओव्हाळ यांनी दिला.



नगरपालिका प्रशासनाने गट काही वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च करून शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी जालना रोड, नगर रोड, बार्शी रोड, मोंढा रोड, कारंजा रोड सह आदी रस्त्यांवरील चौका चौकात सिग्नल उभारले होते. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत आणि कोंडी न होता होईल अशी अपेक्षा होती, परंतु याकडे पालिका प्रशासनाने सरळ सरळ दुर्लक्ष केले असून गत अनेक वर्षापासून ही सिग्नल व्यवस्था बंद अवस्थेत धुळखात पडली आहे. याचा फटका शहरातील वाहनधारकांना बसत असून वारंवार शहरात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, यामुळे वाहनधारकांचा वेळ आणि पैसा खर्ची होत आहे. याकडे पोलीस प्रशासन आणि नगरपालिका प्रशासन का दुर्लक्ष करते असा प्रश्न सर्वसामान्य वाहनधारकांना पडला असून यावर त्वरित मार्ग काढावा, तसेच शहरातील सिग्नल व्यवस्था तात्काळ सुरू करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते गौतम ओव्हाळ यांनी प्रसिद्धी पत्रकार दिला आहे.



भारतीय क्रिकेट १९ वर्षांखालील संघात बीडचे सुपुत्र सचिन धस यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना मा.डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे, सुहास पाटील,मनोज भैय्या जाधव.

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा वाढदिवस रक्तदानासारखे पवित्र दान करून साजरा करा

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा दि ७ डिसेंबर रोजी वाढदिवस असून त्यानिमित्त गावागावातील कार्यकर्त्यांनी भव्य रक्तदान शिबीर आयोजित करून साजरा करावा,अनाठायी खर्चाला फाटा देत हा वाढदिवस साजरा करण्यात यावा असे आवाहन गजानन बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे,दूध संघाचे अध्यक्ष विलास बडगे,माजी सभापती दिनकर कदम माजी सभापती अरुण डाके,जि प सदस्य गंगाधर घुमरे,जि प सदस्य गणपत डोईफोडे,प स सभापती उषा विजय सरवदे,सूत गिरणीचे संचालक अरुण बोंगाणे नगरसेवक विलास विधाते,मुखीद लाला,राणा चव्हाण आदींनी केले आहे

दिनांक सात डिसेंबर रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा वाढदिवस असून या दिवशी रक्तदान करून वाढदिवस साजरा करण्यात यावा, राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती असून या परिस्थितीचे भान ठेवून कार्यकर्त्यांनी कोणताही अनाठायी खर्च न करता सामाजिक हित लक्षात घेता रक्तदानासारखे पवित्र दान करावे, यासाठी बीड विधानसभा क्षेत्रात आणि जिल्हाभरातून विविध ठिकाणी कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबिरे आयोजित करावीत या उपक्रमात मोठ्या प्रमाणात रक्तदान करावे आपल्या रक्तदानातून गरजू रुग्णांना जीवदान मिळणार आहे हे कार्य म्हणजे मोलाचे योगदान राहणार आहे बीड जिल्हा रुग्णालयात रोज हजारो रुग्ण उपचार घेतात



अनेक गरीब रुग्णांना रक्ताची आवश्यकता असते अनेक वेळा रक्ताचा तुटवडा निर्माण होतो त्यावेळेस रक्त उपलब्ध होणे रुग्णांसाठी आवश्यक असते दिनांक ७ डिसेंबर रोजी होणाऱ्या रक्तदान शिबिरात जवळपास ३००० युनिट रक्त संकलित करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्यासारखे उत्सुंग व समाजहित पाहणारे नेतृत्व ज्यांनी आपल्या राजकीय सामाजिक शैक्षणिक जीवनात जनसेवा करताना आरोग्य सुविधा जनतेला उपलब्ध करून देण्यात प्राधान्याने कार्य केले आहे अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र उप आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालय जिल्हा रुग्णालय निर्माण करून जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने रुग्णांना तातडीने चांगले उपचार मिळावेत यासाठी आपल्या राजकीय प्रवासात मोठे काम केलेले आहे त्यांचा कार्याचा विचारांचा आदर करून आपण रक्तदाण्यासारखा पवित्र उपक्रम राबवून सहभाग नोंदवावा बीड विधानसभा क्षेत्रात व बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी जवळपास ५० ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात यावी असे आवाहन गजानन बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे,दूध संघाचे अध्यक्ष विलास बडगे,माजी सभापती दिनकर कदम माजी सभापती अरुण डाके,जि प सदस्य गंगाधर घुमरे,जि प सदस्य गणपत डोईफोडे,प स सभापती उषा विजय सरवदे,सूत गिरणीचे संचालक अरुण बोंगाणे नगरसेवक विलास विधाते,मुखींद लाला,आदींनी केले आहे

# वंचित बहुजन आघाडीच्या राज्यकार्यकारणीची बैठक मंगळवारी मुंबईत

मुंबई ।प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या राज्यकार्यकारणीची बैठक मंगळवारी दि.५ डिसेंबर रोजी मुंबई येथे पार पडणार आहे. राज्यभरात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळतोय.अकोला, मुंबई येथील सभांना लाखोंच्या संख्येने समूदाय जमला होता. त्याच दरम्यान सातारा, धुळे, सटाणा, सांगली येथील सभांनी सुध्दा प्रस्थापित पक्षांच्या छातीत धडकी भरवली होती.मुंबईत राज्य कार्यकारणीची बैठक आगामी काळातील राजकीय रणनीती ठरवण्यासाठी ही बैठक होणार आहे, अशी चर्चा सुरू आहे.सर्व विरोधी पक्षांना वाटतंय की, वंचित बहुजन आघाडी



सोबत असली पाहिजे पण, अजून तरी त्यावर कोणी पाऊल उचललं नाहीये. मुंबई येथे पार पडणाऱ्या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर हे स्वतः उपस्थित राहणार असल्याची विश्वसनीय माहिती मिळाली आहे.आगामी काळात होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या बैठकीला विशेष महत्व असणार असे दिसत आहे. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख राज्य पदाधिकारी यांच्यासह युवा नेते, सुजात आंबेडकर देखील उपस्थित राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.या बैठकीत काय निर्णय होतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



आज पिंपळा धायगुडा येथे मुदस्सर शेख यांच्या विवाहप्रसंगी आदरणीय नंदकिशोर मुंदडा काकाजी व इतर मान्यवर उपस्थित.

# नानासाहेब औटे सरपंच यांच्या वाढदिवसानिमित्त नांदा जि.प.प्राथमिक शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप

आष्टी ।किरण जावळे सर

नांदा गावाचे विद्यमान सरपंच नानासाहेब औटे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा प्राथमिक शाळा नांदा येथे मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. नानासाहेब पंडितराव औटे यांच्या दरवर्षी विविध उपक्रम राबवत वाढदिवस साजरा केला जातो याही वर्षी नांदा येथील शाळेतील मुलांना शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.नाानासाहेब औटे यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प प्राथमिक शाळेच्या वतीने त्यांच्या सत्कार करण्यात आला.यावेळी



शिंदे सर,सरोदे सर,शालेय समिती अध्यक्ष ढोबळे पाटील,पत्रकार किरण जावळे सर,संजय श्रीधर औटे,उपसरपंच बजरंग औटे,व शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमानेच - नानासाहेब औटे

सरपंचगेल्या चार वर्षापासून नानासाहेब औटे यांच्या वाढदिवसानिमित्त समाज हिताचे विविध उपक्रम घेत वाढदिवस साजरा करत आहोत याही वर्षी आम्ही नांदा येथील प्राथमिक शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप करून वाढदिवस साजरा केला. यापुढे देखील असेच विविध उपक्रम घेऊन वाढदिवस साजरा करत राहू.अशी माहीती सरपंच नानासाहेब औटे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगीतली.

# टिपू सुलतानच्या राष्ट्रभक्तीचा अनुवंश मुस्लिमात - लोकपत्रकार

## तलवाड्याच्या जयंतीमध्ये हिंदू मुस्लिमांचे ऐक्य

तलवाडा ।प्रतिनिधी

राष्ट्रभक्तीचा आदर्श दाखला , भारताचे पहिले मिसाईल मैन , कुराण ची तिलावत करत राज्यकारभार करणारा , हिंदुच्या शेकडो मंदिरांना उभे करणारा राजा ह टिपू सुलतान यांची जयंती तलवाडा येथे उत्साहात साजरी झाली . महाराष्ट्रात लोकपत्रकार म्हणून प्रसिद्ध असलेले भागवत तावरे यांच्या व्याख्यानाने युवकांना वैचारिक शिदोरी मिळाली . ह टिपू सुलतान यांचा अनुवंश असलेले मुस्लीम या देशाचे पाईक आणि नायक असल्याचे तावरे यांनी म्हटले . कार्यक्रमाचे अध्यक्ष धोंडराईच्या सरपंच शीतलताई साखरे , प्रमुख पाहुणे तलवाडा येथील सरपंच विष्णू हात्ते, गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण,कुर्ला सरपंच संदीप पाटील, माजी उपसरपंच किरण वावरे,हजरत टिपू सुलतान जयंतीचे अध्यक्ष प्रा गणपत नाटकर, उपाध्यक्ष शरद खुरूद, कार्याध्यक्ष आक्रम सौदागर, सचिव दादाराव रोकडे,शेख रहीम, पत्रकार बापुगाडेकर पत्रकार अल्ताफ कुरेशी, पत्रकार तुळशीराम वाघमारे,सामाजिक कार्यकर्ते नजीर कुरेशी, कालु कुरेशी, मदन हतागळे, अरूण डोंगरे, विठ्ठल हात्ते,आमर वादे, आदींची उपस्थिती होती

तलवाडा येथे प्रतिवर्षी हजरत टिपू सुलतान यांची जयंती साजरी करण्यात येते . या वर्षी भागवत तावरे यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी लोकांनी प्रचंड गर्दी केली , यावेळी लोकपत्रकार यांनी वर्तमान स्थितीवर प्रकाश टाकताना सलोखा कायम ठेवण्याचे आवाहन केले . भारतीय सभ्यता आणि एकोपा आमच्या समाज आणि राष्ट्राची गरज असल्याचे सांगितले . टिपू सुलतान या राजाने आपला जीव दिला मात्र इमान नाही ,अश्या राजाचे वंशज आणि वारस असलेल्या मुस्लिमांनी कायम आपल्या राष्ट्रीय प्रेमाचा दाखला दिलेला आहे , मात्र राजकारणात मुस्लिमांचा द्वेष पसरवून धार्मिक राजकारण केले जात असल्याची खंत व्यक्त करण्यात आली . हिंदू आणि मुस्लिमात सलोखा कायम राहिलेला असताना इतिहासाची निवडक पानेच समोर आणली गेली . अफजलखान , शायेस्तेखान



सांगितले मात्र त्या सोबत मदारी मेहतर देखील सांगणे गरजेचे होते,आमचे काम आहे कि मदारी मेहतर सांगणे . छत्रपती शिवाजी महाराज आणि ह टिपू सुलतान हे कुठल्या एका धर्माचे जातीचे राजे नव्हते तर रयतेचे राजे होते याचा विसर पडू देऊ नका असे आवाहन त्यांनी यावेळी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादा रोकडे तर आभार प्रदर्शन आक्रम सौदागर यांनी केले,

### कुराणची दावत देणारा हिंदू पत्रकार

लोकपत्रकार केवळ सामाजिक तत्वावर बोलत नाहीत तर सोबतच धार्मिक संदर्भाने नैतिक आचरणाचे आवाहन करतात . कुराण मधील अनेक आयात चे तर्जुमे दाखले त्यांच्या भाषणात आले . उर्दू आणि हिंदीवर प्रभुत्व असलेले तावरे बोलू लागले कि ऐकणारे तल्लीन होतात . कुराण मधील आखलेल्या जीवन पद्धतीचे अनुकरण कराल तर सुखी परिवार सक्षम राष्ट्र आणि सृजनशील समाज उभा करू शकाल असे आवाहन त्यांनी केले . सलग तिसरे वर्षे असताना देखील लोकपत्रकार यांना ऐकण्यासाठी प्रचंड गर्दी झाली . एक हिंदू पत्रकार कुराण ची दावत देतो हि अल्लाह ची हिदायत असल्याचे उपस्थितांनी म्हटले.लोकपत्रकार भागवत तावरे यांचा पत्रकार आल्ताफ कुरेशी यांच्या कडून विषेश सत्कार करण्यात आला

# रायमोहा परीसरात बार चालकांची मनमानी

**दारूबंदी विभागाची डोळेझाक**

**शिरूरकासार:-(प्रशांत बाफना)**

**तालुक्यातील रायमोहा परीसरात बार चालकांची मनमानी वाढली असुन अव्वाच्या सव्वा भावाने दारू विक्री करण्यात येत आहे.दारूबंदी विभाग मात्र याकडे सर्रासपणे डोळेझाक करताना दिसत असून ग्राहकांची आर्थिक लूट बार चालकांकडून सुरु असल्यामुळे त्यांच्यावर कोणाचेच नियंत्रण असल्याचे दिसत नाही.त्यामूळे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या बार चालकांवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी ग्राहकांमधुन होत आहे.बियर आणि दारू बॉटल वर असलेल्या किंमतीपेक्षा जास्तीच्या दराने बार चालक उघडपणे विक्री करत असताना दारूबंदी विभागाचे अधिकारी मात्र आपले उखळ पांढरे करून घेण्यात गुंतलेले दिसत आहेत.चढ्या भावाने विक्री करणाऱ्या बार चालकांवर कोणाचेच नियंत्रण नसल्यामुळे ते मनमानी पद्धतीने कारभार चालवत आहेत.त्यामूळे संबधित विक्रेत्यांवर**

## व्हिस्कीची चढ्या भावाने विक्री

**कारवाई करावी अशी मागणी ग्राहक वर्गातून होत आहे.**

तीनशे चाळीस रूपयांच्या बॉटलची पाचशे रुपयांना विक्री

रायमोहा परीसरात जेवण करण्यासाठी बसलेल्या एका ग्राहकाने रॉक फोर्ड क्लासिक नावाच्या ब्रँडची मागणी केल्यानंतर हॉटेल चालकाने ती एका बार मधुन आणून दिली.सदरील बॉटलवर तीनशे चाळीस रुपये किंमत होती परंतू बार चालकाने ती पाचशे रुपयांना दिली होती.ग्राहकाने विचारणा केली असता संबधित हॉटेल चालकाने तेवढे पैसे घेतल्याचे सांगितले.या वरुन बरचालक ग्राहकांची कशा प्रकारे आर्थिक लूट करतात हे दिसून येते.

दहा ते तीस टक्क्यांपर्यंत दर आकारला जावा

एका बॉटलच्या मागे मुळ किमतीच्या दहा ते तीस टक्क्यांपर्यंत जास्तीचा सेवा कर आकारावा.त्यापेक्षा बार चालकांनी जास्तीचे पैसे ग्राहकांकडून घ्यायला नको.

अशोक बापू केदार

-अध्यक्ष,शिरूर तालुका बार असोसिएशन

# धारूर तालुक्यात गावंदरा येथे दोन ठिकाणी घर फोडी उपसरपंचाच्या घरी घरफोडी करत कुटुंबीयांना मारहान



भोगलवाडी (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील गावंदरा येथे दि. ०१/१२/२०२३ वार शुक्रवार रोजी मध्यरात्री ०२ च्या दरम्यान गावंदरा येथे दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत या दरम्याण गावचे उपसरपंच बिभिषण बडे यांच्या घरी चोरीची घटना घडली आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की धारूर तालुक्यातील गावंदरा येथे शुक्रवार रोजी रात्रीच्या मध्य रात्री ०२ दरम्यान उपसरपंच बिभिषण बडे यांच्या घरी चोरी करत त्यांचे चुलते बीड जिल्हा मध्यवर्तीचे मा.उपाध्यक्ष सुदामराव बडे यांच्यावर हल्ला केला असुन त्यांना चेहऱ्यावर गंभीर दुखतात झाली आहे

त्यांच्या वर बीड येथे खाजगी रुग्नालयात उपचार घेण्यात आले याबाबत धारूर पोलीस व बीड पोलीस यांनी गावंदरा येथील या चोरी प्रकरणी भेट देऊन पंचनामा केल्याचे समजते या चोरीच्या घटनेमुळे गावात भितीचे वातावरण निर्माण झाले असुन या घटनेतील चोरांचा शोध घेण्याचे आवाहन बीड व धारूर पोलीसा समोर आहे.

हा प्रकार गंभीर असुन या प्रकरणी धारूर पोलीसा कडून रात्रीच्या वेळी गस्त घालण्याची मागणी गावंदरा ग्रामस्थातुन केली जात आहे.

# दुकाने आस्थापना यांचे नाम फलक मराठीत करावे बीड मनसेची मागणी

बीड ।प्रतिनिधी

राज्य शासनाच्या अधिनियमानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील दुकाने आस्थापना यांचे नाम फलक मराठीत व मोठ्या अक्षरातच असले पाहिजे या करीता दिनांक २५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. परंतु आमच्या असे निदर्शनास आले आहे की, बीड शहरात काहीजण या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचाही आदेश जुमानत नस्तीलतर काय करायला हवं? तुम्ही सांगा सर्वोच्च न्यायालयाचे पालन करायचा कालावधी संपलेला आहे. या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व बीड नगर परिषदेच्या सीईओ अंधारे यांना देण्यात आले आहे.दुकानाने आणि आस्थपना यांचे नाम फलकावर प्रथम दर्शनी अर्थात सुरवातीला मराठी भाषेत देवनागी लिपित नाव लिहिने आवश्यक आहे. तसेच इतर भाषेत देखील नाव लिहिले



जाणार असेतर त्या भाषेच्या तुलणेत मराठीतील नाव हे मोठ्या आक्षरात असले पाहिजे, एवढेच नव्हेतर ज्या आस्थापना मध्ये पुर्विले जाते. किंवा विकले जाते. अशा आस्थापनाच्या नाम फलकावर महान व्यक्तीची किंवा गडकिल्यांची नावे लिहू नये या नियमाचे उलंगन केल्यास संबंधीत दुकाने व आस्थपना मालकांवर महाराष्ट्र दुकाने व आस्थापना व अधिनियम २०१७ च्या तरतुदीनुसार न्यायलयीन कार्यवाही करता येऊ शकते. असे असतांना आपण कोणाच्या आदेशाचीवाट पाहत आहे, महाराष्ट्र शासनाव्दारे महाराष्ट्र अधिनियम क्रं. २४ मध्ये दिनांक १७ मार्च २०१७ अन्वये महराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०२२ कलम ३६ का।चा कलम ६ अन्वये नोंदणी केलेल्या प्रत्येक आस्थपनेला किंवा ज्या आस्थापनेला कलम ७ लागु आहे. प्रत्येक आस्थापनेचा नाम फलक देवनागी लिपीत मराठी भाषेमध्ये असला पाहिजे, परंतु असा आस्थापनेच्या नियुक्त्याकडे देवनागरी लिपित मराठी व्यतिरिक्त इतर कोणत्याही भाषेतील व लिपितील नाम फलक देखील मराठी भाषेतील आक्षराचा टकं आकारा पेक्षा लहान असता कामानये म्हणजेच मराठी टकं आकार ईतर कोणत्याही भाषा पेक्षा मोठ्या आक्षरात असणे आवश्यक आहे. आम्ही या पत्राव्दारे आपणास विनंती करी ईच्छीतो की, बीड शहरातील ज्या दुकानाची व आस्थापनाची नावे ईतर भाषेमध्ये असतील तर त्यांनी ३ डिसेबर २०२३ रोजी पर्यंत बदलावी अन्यथा महराष्ट्र नवनिर्माण सेना तिवृ स्वरुपाचे अंदोलन छेडेल याची नोंद घ्यावी. याप्रसंगी त्याचे करण लोंढे शहराध्यक्ष यश जगताप, विकास आहेर, ओम पालवे आदी उपस्थित होते.

# एकलारा (पुंज) येथे ५ डिसेंबर रोजी भव्य कुस्त्यांचे आयोजन ..!

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मौजे एकलारा येथील प्रसिद्ध असलेली ग्रामदैवत श्री.वीरभद्र स्वामी यात्रेनिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दि.२६ नोव्हेंबर ते ०५ डिसेंबर पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.याचदरम्यान दि.२६ नोव्हेंबर रोजी श्री.स्वामींच्या हळदीचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. तर ४ डिसेंबर रोजी वीरभद्र स्वामी चे लग्न अक्षदा,०५ डिसेंबर रोजी सकाळी अग्निकुंड तदनंतर पालखी सोहळा व दुपारी ठिक ३:०० वाजता गावकऱ्यांच्या वतीने भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे.शेवटची कुस्तीसाठी ११,१११ रूपयाचे बक्षीस प्रसिद्ध युवा उद्योजक सदाशिव निवृत्ती पा. देवकत्ते एकलारकर यांच्या वत्तीने देण्यात येणार आहे यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांसह गावकरी मंडळींसाठी दि.०५ डिसेंबर रोजी युवा उद्योजक सदाशिव पा देवकत्ते एकलारकर यांच्या वतीने सकाळी १० ते सायंकाळी ०७ वाजे पर्यंत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



एकलारा भूमिपुत्र प्रसिद्ध युवा उद्योजक सदाशिव पा.देवकत्ते यांच्या वत्तीने दरवर्षी यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांसाठी दिवसभर महाप्रसाद वाटप व कुस्त्यां खेळण्यासाठी येणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शेवटची कुस्तीसाठी भर भरून बक्षिसाचे पारितोषिक देऊन यात्रेच्या निमित्ताने करत असलेल्या धार्मिक , सामाजिक कार्याबद्दल एकलारा सह पंचक्रोशीतील नागरिकांनी युवा उद्योजक सदाशिव पा. देवकत्ते एकलारकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## भाच्याने मामाला ७० लाखाला गंडविले प्रकरणात
# भाच्याला जामीन मंजूर

बीड (प्रतिनिधी)

शेख इसाक शेख महेमुद, रा. आसैफ नगर, बीड यांनी फिर्याद दिली की,आरोपीने शेअर मार्केट मध्ये तसेच इंटरनॅशनल ऑनलाईन मार्केट मध्ये जास्तीत जास्त पैसे गुंतवा आणि भरपूर नफा मिळवा, असे आमिष दाखवून आरोपीने फिर्यादीस वेळोवेळी

शेअर मार्केट मध्ये जास्तीत जास्त नफा मिळत असल्याचे सांगून, ऑनलाईन तसेच नगदी रोख ७० लाख रुपये घेऊन परत न करता माझी फसवणूक केली, या फिर्यादी वरुन पोलीस ठाणे सायबर, बीड येथे गु.र.नं.६५/२०२३ कलम आय.टी. अॅक्ट ६६, ६६ (क) व ४२७, १२०३, ३४ भा. दं. वि.प्रमाणे आरोपी सय्यद तलहा जमाल, रा. पूणे व ईतर एक यांना अटक करून न्यायालयात हजर केले होते. न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले. त्यानंतर आरोपीच्या वतीने अॅड. शेख इलियास यांनी जामीनवर युक्तीवाद केला. फिर्यादी व आरोपी व हे नातेवाईक आहेत. तसेच त्याचे घरातील अंतर्गत कलहामुळे खोटी फिर्याद दिलेली आहे. मा.न्यायालयाने आरोपीचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपीचा जामीन मंजूर केला. आरोपीचे वतीने अॅड. शेख इलियास यांनी बाजू मांडली व त्यांना अॅड. रईस पठान यांनी सहकार्य केले.




मुंबई - निती आयोग व अप्रतिम मीडिया यांनी महाराष्ट्राचा शाश्वत विकास ध्येयांसाठी पत्रकारितेचे महत्त्व या विषयावरील पहिली राज्यस्तरीय परिषद घेतली. गुरुवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात दिवसभर चाललेल्या परिषदेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. परिषद समारोपाला केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे संयोजक डॉ.अनिल फळे यांच्यासह माध्यम क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि राज्यभरातील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त समता सैनिक बनून अभिवादन करा

### कॅप्टन राजाभाऊ आठवले मेजर, समता सैनिक दल,बीड बटालियन

बीड /प्रतिनिधी

मुंबई येथे ६ डिसेंबर बुधवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या समता सैनिक दलाच्या चळवळीमध्ये प्रत्येक बौद्ध समजणाऱ्या व्यक्तीने समता सैनिक बनुन अभिवादन करावे, असे आवाहन बीड समता सैनिक दलाचे मेजर, कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले आहे. आवाहन करत असताना कॅप्टन आठवले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध समाजातील तरुणांना दिलेल्या संदेशाचा विचार करून प्रत्येक बौद्ध तरुणांनी समता सैनिक दलामध्ये सामील व्हावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध समाजातील तरुणांना दिलेला संदेश ... दलाच्या शाखा सर्वत्र स्थापून आपली शक्ती वाढवा. (दि. ३०/१२/१९४४ रोजी कानपूर येथे अ.भा. समता सैनिक दलाचे दुसरे अधिवेशनतील बाबासाहेबांचे भाषण. जनता, दि. ६ जानेवारी १९४५) माझ्या समता सैनिक दलाच्या शूर सैनिकांनो, आज या संयुक्त प्रांतात दलाचे दुसरे अधिवेशन भरले आहे. गेल्या १७ वर्षांपासून या दलाचे कार्य मुंबई व मध्यप्रांत येथे मोठ्या जोराने चालले आहे. दोन्ही प्रांतांत दहा हजारावर समता सैनिक दलाचे श्रेष्ठ सैनिक उभे आहेत. माझ्या मुंबई प्रांतात काही वर्षांपूर्वी आपल्या किंवा इतर पक्षाची जाहीर सभा काँग्रेसचे गुंड उधळून लावीत असत. १९२७ साली या दलाची स्थापना माझे हस्ते करण्यात आली. त्या दिवसापासून आमच्या सभेत काँग्रेसचा गुंड अथवा एखादा मवाली शिरण्याची ताकद नाही. एकदा माझ्या ऑफिससमोर विरोधी पक्षाची मोठी जाहीर सभा भरली होती. त्या सभेत आपले सैनिक गेले आणि ती



सभा व सभेतील दिवाबत्ती, टेबल, खुर्ची वगैरे काबीज करुन माझ्या ऑफिसमध्ये आणून टाकली. ते अद्याप माझ्याकडे तसेच आहे. या वस्तू म्हणजे आपल्या या सैनिकांच्या कार्याचे द्योतक आहे. सांगण्याचा उद्देश एवढाच की आपले सैनिक इतके तडफदार आहेत. ते मनात आणतील तर त्यांच्यावर सोपविलेले कार्य चुटकीसरशी करुन दाखवितील इतका मला विश्वास वाटत आहे.



कीर्तन महोत्सव गुंधा

आज मराठायोद्धा मराठ्यांचे क्रांतिसूर्य मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बीड तालुक्यातील गुंधा येथे चालू असलेल्या साखळी उपोषणाचा*३२ वा दिवस चालू असून, आज उपोषण स्थळी *महाराष्टातील सूप्रसिध्द कीर्तनकार ह भ प कल्याण महाराज देवडकर यांची कीर्तन सेवा सर्व समाज बांधवांच्या उपस्थिती संपन्न झाली, सुप्रसिध्द मृदुंगचार्य बाजीराव महाराज काळे,मुरुदुंगचार्य*महेश महाराज लोणकर, विकास महाराज निर्मळ, बाळू महाराज मते,किशोर महाराज मते,आसाराम महाराज मोरे,महादेव महाराज मोरे,नवनाथ महाराज मोरे उत्रेश्वर महाराज मोरे,रतन जिजा मोरे, सरपंच नंदकिशोर मोरे, ग्रा. प सदस्य सुदर्शन दादा मोरे, मा.उपसरपंच प्रशांत भैया मोरे,दत्ता महाराज मोरे,सखाराम महाराज मोरे आदि,सर्व गावकरी मंडळी, माता भगिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते....एक मराठा लाख मराठा.

# 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा धोका

## कुठे होणार अवकाळी पाऊस? मुंबईवर नेमका काय परिणाम होणार?

### शेतकर्याला पुन्हा एकदा अवकाळीची चिंता

**मुंबई ।प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांत राज्यभरात पडलेल्या अवकाळी पावसामुळे मुंबईला फायदा झालेला असला तरी राज्यभरात इतरत्र मात्र बळीराजाचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. टरारुन आलेली पिके पाण्यामुळे वाहून गेली, तसेच त्यांच्यावर रोग पडल्याने शेतकरी पुन्हा एकदा चिंतेत सापडला आहे. दुष्काळात तेरावा महिना म्हणून की काय आता आणखी एक नवे संकट बळीराजासमोर उभे ठाकले आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आणि वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे राज्यात पुढील २४ तासांत काही ठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार डिसेंबर महिन्यातही अवकाळी पावसाची हजेरी कायम राहणार आहे. तसेच बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचं लवकरच चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. या दोन्ही गोष्टींमुळे राज्यासह देशाच्या तापमानावर परिणाम होणार आहे. तर दुसरीकडे पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.



### 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा धोका

दक्षिण-पूर्व बंगालचा उपसागर आणि दक्षिण अंदमान समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे 'मिचॉन्ग' चक्रीवादळाचा धोका आहे. हे संभाव्य वादळ देशाच्या दक्षिण भागात धडकणार असले तरी त्याचा परिणाम महाराष्ट्रावर देखील होणार आहे. चक्रीवादळ मिचॉन्ग सोमवारी पहाटे पूर्व किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. उत्तर तामिळनाडू आणि शेजारील दक्षिण आंध्र प्रदेशातील किनारपट्टी जिल्हे सर्वाधिक प्रभावित होऊ शकतात. भारतीय हवामानशास्त्र विभागाने अद्याप हे वादळ नेमके कोठे धडकेल हे सांगितलेले नाही.

मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात विजांच्या गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. मध्यम ते हलक्या स्वरुपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. पुढील २४ तासांत विदर्भात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज अकोला, वाशिम, बुलढाणा, अमरावती या भागात वादळी वाऱ्यांसह गारपीट होण्याची शक्यता असल्याने या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.दरम्यान, बंगालच्या उपसागरात मिचॉन्ग चक्रीवादळ तयार झाल्यामुळे मुंबई आणि उपनगरातील तापमानात पुन्हा वाढ होईल, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# परळीचे सुपुत्र जिल्हा न्यायाधीश कृष्ण गोपाल तोतला सेवानिवृत्त

**परळी ।प्रतिनिधी**

परळी चे सुपुत्र तथा लातूर येथील जिल्हा न्यायाधीश कृष्ण गोपाल तोतला हे तब्बल २८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० नोव्हेंबर रोजी न्यायाधीश या सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांचा लातूर येथे भव्यदिव्य असा निरोप समारंभ पार पडला.

वकिली व्यवसायापासून आपल्या सेवेची सुरुवात करून १९९५ मध्ये न्यायाधीश या पदावर रुजू होऊन मुंबई, संभाजीनगर, उल्हासनगर, नागपूर, नांदेड,अशा विविध ठिकाणी न्यायाधीश तसेच सहाय्यक धर्मादाय आयुक्त या पदावर आपल्या कार्याची एक आगळीवेगळी छाप टाकणारे परळीचे सुपुत्र कृष्ण गोपाल तोतला हे ३० नोव्हेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले.लातूर



येथील न्याय मंदिराच्या भव्य अशा सभागृहामध्ये त्यांचा निरोप समारंभ पार पडला. त्यांच्या या निरोप समारंभाच्या वेळी लातूरचे मुख्य न्यायाधीश, वकील संघाचे सर्व पदाधिकारी, व वकील संघाचे सदस्य, आणि न्याय मंदिरातील विविध पदावर काम करणारे क्लार्क व कर्मचारी यावेळी त्यांना निरोप देण्यासाठी बहुसंख्येने उपस्थित होते. अत्यंत भावनिक अशा पार पडलेल्या या समारंभात अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करून श्री तोतला यांना निरोप दिला. यावेळी मुख्य न्यायाधीश यांनी आपली भावना व्यक्त करताना सांगितले, की श्री तोतला यांचे लातूर येथील योगदान तसेच त्यांनी इतर ठिकाणी केलेले काम हे येणाऱ्या पिढीस नक्कीच प्रेरणादायी ठरेल असे ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमास हजेरी लावलेल्या अनेकांचे डोळे पानावले होते .

# राजेश टोपे यांच्या कारवर हल्ला


## जालना येथे चार-पाच जणांच्या टोळक्याकडून गाडीची तोडफोड; चालक सुदैवाने वाचला!

जालना - जालना येथे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार राजेश टोपे यांच्या गाडीवर आज अज्ञातांनी हल्ला केला. विशेष म्हणजे यावेळी गाडीत टोपे यांचा चालक होता. तो बालमबाल बचावला.

हल्लेखोरांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. या प्रकरणी दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी राजेश टोपे यांनी केली आहे.

लोखंडी दांडा, ऑईलची बाटली...

जालना येथील जिल्हा मध्यवर्ती बँकच्या खाली राजेश टोपे यांची गाडी उभी होती. या गाडीवर अज्ञातांनी हल्ला केला. या घटनेत टोपे यांच्या गाडीच्या काच्या फुटल्या असून, गाडीजवळ एक लाकडी दांडा आणि ऑईलची बाटली देखील सापडली आहे. चार ते पाच जणांच्या टोळक्याने गाडीवर हल्ला केल्याचे समजते. जालन्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमोर टोपे



यांची गाडी थांबली होती. यावेळी टोपे यांचा चालक गाडीमध्येच उपस्थित होता. या हल्ल्यात तो बालमबाल बचावला.

राजेश टोपे यांनी यावर तीव्र शब्दांत असंतोष व्यक्त केला. ते म्हणाले की, असंतुष्ट लोकांनी हे कृत्य केले आहे. या प्रकरणी पोलिसांनी योग्य ती कारवाई केली पाहिजे. ज्या लोकांनी कायदा हातात घेतला असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, असे माझे वैयक्तिक मत आहे. जिल्ह्यातील सर्व निवडणूक बिनविरोध पार पडलेली असताना ज्यांनी अशा पद्धतीने कायदा हातात घेऊन काम केले असेल त्यांना खरेच शिक्षा व्हायला पाहिजे,

राजेश टोपे म्हणाले की, दगडफेकीची घटना घडली, तेव्हा चालक गाडीमध्ये होता. त्याच्या जीवावर बेतले होते. आता आम्ही निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी वरच्या मजल्यावर होतो.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT